जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No:
+919819208279

प्रेसनोट **दि. १६/०९/२०२६**

गुन्हे शाखा घटक - २, भिवंडीची कामगिरी

''१०,३८,३५०/- रू. किमतीचा २०.९६७ किलो गांजा हा अमली पदार्थ जप्त केलेबाबत''

----------oooooooooo----------

गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी नेमणुकीतील पोहवा/६९६० वसंत चौरे यांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमीवरून गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक. श्री. शितल राऊत यांच्या अधिपत्याखाली पथकाने दि. १२/०९/२०२६ रोजी ''इदगाह कब्रस्थान समोरील रोडवर, इदगाह रोड, भिवंडी, जि. ठाणे याठिकाणी सापळा कारवाई करून आरोपी मोहम्मद अफसर मुमताज अन्सारी वय २२ वर्ष, रा. घर नं. ७०३, आयटीआय कॉलेजच्या समोर, इदगाह रोड, भिवंडी याच्या ताब्यातुन **१०,३८,३५०/- रू. किमतीचा २०.९६७ किलो गांजा हा अमली पदार्थ जप्त** करण्यात आला आहे. त्याबाबत भोईवाडा पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ३८८/२०२६, एन. डी. पी. एस. ॲक्ट कलम ८ (क), २२ (क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी करीत आहे.

वरील कामगिरी ही मा. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, मा. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, व मा. शेखर बागडे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शोध - १, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक - २ भिवंडीचे वपोनिरी. श्री. शितल राऊत, सपोनि/अजय कुंभार, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रामचंद जाधव, पोहवा/निलेश बोरसे, पोहवा/वसंत चौरे, पोहवा/प्रशांत राणे, पोहवा/शिवाजी मुर्तडक, पोहवा/साबीर शेख, मपोहवा/अनुष्का पाटील, मपोहवा/सायली गंभेरा, पोशि/संजय चव्हाण, पोशि/अमोल इंगळे, पोशि/सर्फराज तडवी, पोशि/भावेश घरत यांनी केली आहे.